## डॉ. विखे यांचा अर्ज निकाली काढल्याचे वृत्त चुकीचे ! (पान ३ वर)




# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३११, रविवार १ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# भावींचा परफेक्ट कार्यक्रम होणार !

## देवीभोयरे येथे लंके दाम्पत्याचा सत्कार

देवीभोयरे : संदीप इधाटे

**लोकसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीला भरघोस यश मिळाले. नगर दक्षिण मतदारसंघातही आपण इतिहास घडविला. किरकोळ अपवाद सोडले तर सर्वच बुथवर मला आघाडी मिळाली. असे असतानाही विधानसभा निवडणूकीसाठी अनेक भावी मतदारसंघात मिरवत असून मतदार त्यांचा परफेक्ट कार्यक्रम करणार असल्याची टीका खासदार नीलेश लंके यांनी देवीभोयरे येथे बोलताना केली.**

लोकसभा निवडणूकीत ऐतिहासिक विजय संपादन केल्याबद्दल देवीभोयरे ग्रामस्थांच्या वतीने खासदार नीलेश लंके तसेच त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांच्या -हृदय सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी खा. लंके यांनी उपस्थितांशी मनमोकळा संवाद साधला.

यावेळी बोलताना खा. लंके हे भावूक झाले. ते म्हणाले, ज्या देवीभोयरे येथील ग्रामस्थांची आणि माझी अनेक महिने, अनेक दिवस भेट झाली नाही त्यांनीच माझ्या लोकसभेतील विजयासाठी नवस केले, हीच माझी मोठी संपत्ती आहे. देवीभोयरेकरांनी मला माझ्या विधानसभा निवडणूकीत आणि आताच्या लोकसभा निवडणूकीत भरभरून दान दिले. लोकसभेची निवडणूक तर सर्वांनी हाती घेतली. संपूर्ण मतदारसंघात या गावातील लोक फिरत होते. तुमच्याच सहकार्यामुळे मी लोकसभेत जाऊ शकलो अशी कृतज्ञता खा. लंके यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

यावेळी किसनराव रासकर, अमृताशेठ रसाळ, सुनील वराळ, डॉ. आबासाहेब खोडदे, बाजार समिती व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मारूती रेपाळे, ठकाराम लंके, उमाताई बोरूडे, शिवाजी वराळ, शिवाजी लंके, भास्कर कवाद यांच्यासह तालुक्यातील विविध गावांचे सरपंच, चेअरमन उपस्थित होते.



■ देवीभोयरे येथे खा. नीलेश लंके यांच्या सत्कारानिमित्त आयोजित कार्यक्रमात खा. नीलेश लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

### हे भाग्य कुणाच्या नशिबी ?

सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असताना मला येण्यासाठी उशिर होऊनही रात्रीचे साडेदहा वाजले तरी मायबाप जनता माझ्यासाठी इथे बसून आहे, हे प्रेम मला मिळाले यापेक्षा दुसरे भाग्य कुणाच्या नशिबी ? असे सांगतानाच याचा मला अभिमान आहे. तुमच्यासाठी मी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही खा. लंके यांनी यावेळी बोलताना दिली.

### हीच माझी संपत्ती

निवडणूका आल्या की लोकांच्या सुख, दुःखात सहभागी होणारा मी नाही. गेली अनेक वर्षे मी, माझ्या परीवारातील सदस्य प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होतात. त्यामुळेच आज देवीभोयरे येथील कार्यक्रमासाठी उशिर होऊनही ही मायबाप जनता इथे उपस्थित आहे. हीच माझी संपत्ती आहे.

### अगोदर अंबिकामातेच्या चरणी नतमस्तक

राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या देवीभोयरे येथील अंबिका देवस्थानचे लाखो भक्त आहेत. याच अंबिकामातेने मला आशिर्वाद दिले आहेत. देवीने माझ्यावर अशीच सदैव कृपादृष्टी ठेवली आहे. त्यामुळेच देवीभोयरे इथे आल्यावर सर्वप्रथम मी नेहमी आईच्या चरणी नतमस्तक होतो, आशिर्वाद घेतो असे खा. लंके म्हणाले.

### दुध कांद्याच्या भावासाठी संघर्ष करणार

ज्यावेळी महाविकास आघाडीचे सरकार होते त्यावेळी शेतकरी सुखी, समाधानी होता. हे सरकार पाडण्यात आल्यानंतर दुधाचे भाव कोसळले, कांद्याची निर्यात बंदी करण्यात आली. आता मात्र ज्यावेळी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येईल त्यावेळी दुधाला कमीत कमी ४० रूपये हमीभाव मिळाला पाहिजे यासाठी मी संघर्ष करेल, माझे पद पणाला लावेल अशी ग्वाही देतानाच केंद्र सरकारने कांद्यावर निर्यात बंदी लागू करू नये यासाठीही आपण संसदेत संघर्ष करणार असल्याची ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. पहिल्यांदाच संसदेत गेल्यानंतर कांद्याच्या निर्यात बंदीविरोधात आवाज उठविला. मात्र स्थानिक विरोधकांनी माझा हा संघर्ष व्हिडीओ मॉर्फ करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र संसदेच्या रेकॉर्डवर सगळ्या गोष्टी असल्याचे खा. लंके यांनी ठामपणे सांगितले.

### माझ्या विकास कामांना स्थगिती

मी सत्तेत होतो, सत्तेबाहेर होतो, माझ्या कर्तृत्वावर मी कोट्यावधी रूपयांची विकास कामे मंजुर करून आणली. मात्र राजकारण डोळ्यापुढे ठेऊन कोट्यावधी रूपयांच्या विकास कामांना स्थगिती देण्यात आली. अर्थात लोकसभा निवडणूकीनंतर या कामांना प्रारंभ झाला असून अंबिकदेवी मंदिर परीसराच्या विकासासाठी मी कटीबध्द राहील अशी ग्वाही लंके यांनी दिली.

### वांढेकरांचे दान

लोकसभा निवडणूक जिंकून पारनेर तालुक्यामध्ये इतिहास घडविणाऱ्या खा. नीलेश लंके यांच्या या सत्कार सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ प्रसिध्द अभियंता वसंत वांढेकर यांनी अंबिका देवस्थानला ५० हजार रूपयांची देणगी देत राणीताई लंके यांनी आमदार होऊन मंत्रीपदाची संधी त्यांना मिळावी असे साकडे त्यांनी घातले.

### पारनेमध्ये महाविकास आघाडीचाच आमदार

लोकसभा निवडणूकीमध्ये सच्चा शिवसैनिकांनी प्रामणिकपणे जबाबदारी पार पाडली. महाविकास आघाडीचा धर्म पाळणाऱ्या या शिवसैनिकांना राजकीय न्याय देण्याची जबाबदारी माझी आहे. विधानसभा निवडणूकीमध्ये श्रेष्ठी जो उमेदवार देतील त्यासाठी लोकसभा निवडणूकीप्रमाणेच साथ देण्याचे आवाहन खा. लंके यांनी यावेळी केले. विधानसभा निवडणूकीसाठी उमेदवाराची घोषणा झालेली नाही. लोकसभा आघाडीचे नेते ज्या पक्षाचा उमेदवार देतील त्याला विजयी करण्याची जबाबदारी माझी असल्याचे सांगतानाच पारनेर-नगर मतदार संघात महाविकास आघाडीचाच उमेदवार विजयी होणार तसेच नगर जिल्ह्यातील सर्व आमदार महाविकास आघाडीचेच असणार याचा पुनरूच्चार खा. लंके यांनी यावेळी बोलताना केला.

### विधानसभा उमेदवारीचा शब्द देणारा मी कोण ?

लोकसभा निवडणूकीदरम्यान महाविकास आघाडीचा घटकपक्ष शिवसेनेच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांनी उध्दव ठाकरे यांचा आदेश मान्य करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे यांच्या उपस्थितीमध्ये नगरमध्ये झालेल्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीमध्ये ताकद देण्याचा मी शब्द दिला आहे. विधानसभा निवडणूकीच्या उमेदवारीचा शब्द देणारा मी कोण ? असा सवाल करत महाविकास आघाडीचे नेते शरद पवार, उध्दव ठाकरे, बाळासाहेब थोरात हे पारनेरसह जिल्ह्यातील जागा कोणत्या पक्षाला द्यायच्या यावर अंतिम निर्णय घेणार आहेत. जो निर्णय असेल तो मला शिरसांवद्य असेल. लोकसभा निवडणूकीदरम्यान नगरमध्ये झालेल्या बैठकीस अनेक शिवसैनिक उपस्थित होते. ते या घटनेचे साक्षीदार आहेत. मी जो शब्द दिला तो पाळतो, देता येत नसेल तर नाहीच सांगतो असेही खा. लंके म्हणाले.




### जितेश सरडे यांचे भाकीत

राणीताई लंके यांचा वाढदिवस २४ मे रोजी असतो. आताचे साल २०२४ सुरू आहे. नीलेश लंके हे २४ ऑक्टोबर रोजी आमदार म्हणून विजयी झाले. २४ ची बेरीज ६ आहे त्यामुळे खा. नीलेश लंके यांना लोकसभा निवडणूकीमध्ये ६ मतदारसंघांची जबाबदारी मिळाली. म्हणूनच सन २०२४ या सालामध्ये २४ जन्मदिनांक असलेल्या राणीताई लंके याच आमदार होणार आहेत.

जितेश सरडे
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आयटी सेल

### पहिल्या आमदार म्हणून राणीताई हव्यात

अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीचा पाया जि. प. च्या मा. सदस्या राणीताई लंके यांनी रचला. गेल्या पंधरा वर्षांपासून राणीताई समाजकारण, राजकारणात आहेत. खा. लंके यांच्या खांद्याला खांदा लावून त्या सर्वसामान्यांच्या सुख, दुःखात सहभागी होतात. लोकसभेची उमेदवारी त्यांचीच होती आणि त्यांचाच विजय होणार होता, तरीही श्रेष्ठींच्या आदेशाने त्यांना माघार घ्यावी लागली. तब्बल पंधरा वर्षे योगदान देणाऱ्या राणीताई यांची लोकसभेची उमेदवारी टाळण्यात आल्याने आता विधानसभेला पहिल्या महिला आमदार म्हणून त्यांनाच संधी हवी.

हर्षदा वाळुंज

### अनेकांची नवसपुर्ती

पारनेर तालुक्याचा उमेदवार लोकसभा निवडणूकीत उतरल्यानंतर जिल्ह्यासह राज्यातील अनेकांनी त्यांच्या विजयासाठी नवस केले होते. देवीभोयरे येथेही अनेकांनी केलेल्या नवसांची पुर्ती नीलेश लंके व राणीताई लंके यांच्या उपस्थितीत करण्यात आली. दुध संस्थेचे चेअरमन शांताराम बेलोटे, संचालक लक्ष्मण नारायण बेलोटे, जगदंबा संस्थेचे संचालक सखाराम बलोटे यांनी नीलेश लंके व राणी लंके यांची सप्तनीक गुळ तुला, विद्यमान सरपंच अशोकराव मुळे, सेवा संस्थेचे संचालक संदीप शिवाजी मुळे, दत्तात्रय सुड, उपसरपंच दत्तात्रय शंकर मुळे यांच्या वतीने पेढे तुला तर पंचायत समितीचे मा. सदस्य सुभाष बेलोटे यांची यावेळी वही तुला करण्यात आली.


### लंके दाम्पत्याला तुतारीची भेट

यावेळी लंके दाम्पत्याला तुतारीची भेट देण्यात आली. ४ बाय ३ फुट उंचीची तुतारी त्यासोबत खा. नीलेश लंके यांचा फोटो असलेली फ्रेम संपत वाळुंज, अशोक मुळे, विनोद साळवे यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आली होती. ही फ्रेम खा. लंके यांच्या पारनेर येथील कार्यालयात लावण्याचा देवीभोयरेकरांचा आग्रह आहे.



# युवा

## ...तर पुढे धोका आहे !



**असं म्हणतात की जोड्या या स्वर्गातच बनतात. जो जोडीदार आपल्या नशिबात लिहिलेला असतो तोच आपल्याला मिळतो. ही गोष्ट जरी खरी असली तरी स्वतःसाठी जोडीदार कसा निवडावा हे सुद्धा आपल्या हातातच असतं. अनेक व्यक्ती अशा असतात ज्यांना इतरांच्या दबावाखाली लग्न करावं लागतं, मात्र अशा अनेक व्यक्ती असतात ज्यांना जोडीदार निवडण्याची सुवर्णसंधी मिळते. अशीच संधी जर तुम्हाला मिळाली तर त्याचं नक्की सोनं करा. खास करून तरुणींनी या दृष्टीने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण त्या आपल्या घरातल्या व्यक्तींना सोडून दुसऱ्याच्या घरात जातात. अशावेळी आपण ज्या व्यक्तीची निवड करतो आहोत तो खरंच आपल्यासाठी योग्य व सुरक्षित आहे का हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. असे नाही केले तर मग आयुष्यभर पश्चाताप करण्याची वेळ येऊ शकते. आज जाणून घेऊया अशा काही गोष्टी ज्या प्रत्येक तरुणीने आपल्या जोडीदारात शोधल्याच पाहिजेत. शिवाय ग्रीन फ्लॅग दिसल्याशिवाय मुलांनीही रिलेशनशिपमध्ये पुढे जाण्याचा निर्णय घेऊ नये.**

### रेड फ्लॅग आणि ग्रीन फ्लॅग

रेड फ्लॅग जोडीदाराच्या त्या सवयी असतात, ज्यामुळे तुम्ही दुःखी किंवा अस्वस्थ होतात आणि तुम्हाला पुन्हा पुन्हा त्याच्यावर संशय निर्माण होतो. एकंदर त्या व्यक्ती बाबत खात्री राहत नाही. याचा सरळ अर्थ असे दाखवतो की हे नाते संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. ग्रीन फ्लॅगचा अर्थ असा की जोडीदाराच्या त्या गोष्टी ज्या दर्शवतात की हे नाते तुम्ही दुसऱ्या स्टेजकडे घेऊन जाऊ शकता आणि बिनधास्त त्या व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय घेऊ शकता. तो तुम्हाला नक्की आयुष्यभर सांभाळेल.

### त्यालाही आत्मविश्वास हवा

वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी, व्यक्तीमध्ये आत्मविश्वास असणे खूप महत्वाचे आहे. जर तुमच्या प्रियकराला तुमच्यावर किंवा या नात्यावर विश्वास नसेल, तर याचा अर्थ त्याला तुमच्यासोबत भविष्य दिसत नाही. लग्नासाठी नेहमी अशी व्यक्ती निवडा जी तुमच्यावर फक्त प्रेमच करत नाही तर अवघे आयुष्य तुमच्यासोबत व्यतीत करण्यासाठी ती व्यक्ती ठाम असायला हवी. अशी क्वालिटी जर तुम्हाला तुमच्या आताच्या जोडीदारात दिसत असले तर लग्नाचा विचार करण्यास हरकत नाही.

### ध्येयावर विश्वास ठेवणारा

तुमच्या ध्येयांना आणि स्वप्नांना आधार देणारा जीवनसाथी जर तुम्हाला मिळाला तर तुम्ही खरंच खूप भाग्यवान असाल. म्हणूनच, त्याच्यासोबत भविष्याची स्वप्ने पाहण्याआधी आपल्या प्रियकरामध्ये ही गुणवत्ता आहे का ते पाहणे महत्वाचे आहे. जर तुमचा प्रियकर तुमच्या निर्णयांकडे लक्ष देत नसेल किंवा तुमच्या इच्छांना निरर्थक म्हणत असेल तर तो तुमचा जीवनसाथी होण्यास योग्य नाही असेच संकेत त्यातून मिळतात. कारण जोडीदार असा हवा जो तुमची प्रत्येक गोष्ट आपली म्हणेल.

### मनमोकळा संवाद

संवाद ही आनंदी नात्याची गुरुकिल्ली मानली जाते. जिथे दोन लोक एकमेकांचे ऐकायला तयार असतात तिथे संघर्षाची शक्यता कमी असते. अशा परिस्थितीत जर तुम्ही आणि तुमचा प्रियकर कोणत्याही गोष्टीबाबत जर मनमोकळा संवाद साधत असाल तर याचा अर्थ तुमच्यामधील बॉन्डीन्ग आणि केमिस्ट्री खूप सुंदर आहे आणि तुम्ही हे नाते आयुष्यभरासाठी जपू शकता.

### प्रभावाखाली येणारा नसावा

अशा लोकांवर विश्वास ठेवणे कठीण आहे जे चटकन एखाद्याच्या प्रभावाखाली येतात. म्हणूनच बॉयफ्रेंडमध्ये आपल्या भावी पतीला शोधण्यापूर्वी नेहमी त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे तपासा. तो कोणाच्याही बोलण्यात लगेच येत नाही ना, किंवा छोट्याश्या गोष्टीवरून सुद्धा संशयी वृत्तीने वागत नाही ना ते तपासा. जर त्याला अशी सवय असले तर लग्नानंतर तुमचे आयुष्य उध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही. कारण अशी लोकं कधीच सारासार विचार करणारी नसतात आणि त्याचा त्रास स्वतःला होतो.

### चुकांची जबाबदारी घेणारा

आपल्या चुका मान्य करणे हे एक उत्तम व्यक्ती असण्याचे लक्षणे आहे. जे आपल्या चुका मान्य करत नाहीत, ते सर्व चुकांसाठी इतरांना दोष देतात. मग अशा व्यक्तीसोबत आयुष्यभर आनंदाने जगता येईल का? हा प्रश्न स्वतःला विचारा आणि अशा जोडीदारापासून दूरच राहा.

### तुमच्यासाठी वेळ काढणारा

जर तुमचा जोडीदार त्याच्या बिझी वेळापत्रकातूनही तुमच्यासाठी वेळ काढत असेल तर याचा अर्थ तुम्ही त्याच्यासाठी महत्त्वाचे आहात. त्याच्या आयुष्यात तुमची किंमत खूप मोठी हे आणि तुमचे स्थान अव्वल आहे. ही गोष्ट चांगल्या जोडीदाराचेही लक्षण आहे. त्यामुळे अशा व्यक्तीसोबत तुम्ही सुखी संसाराची स्वप्ने पाहू शकता.

# स्माईलिंग डिप्रेशन!



**नैराश्यात अनेक जण एकटे राहतात, रडणे, ओरडतात, अशा लोकांची सतत चिडचिड होते. पण काही जण लोकांच्या बाबतीत असे होत नाही. काही जण त्यांचे दुःख एक स्माईलच्या मागे लपवतात. या प्रकाराला स्माईलिंग डिप्रेशन म्हणतात. नात्यात अनेकदा होणाऱ्या छोट्या मोठ्या भांडणांमुळे अनेकदा नैराश्य येते. एखाद्या व्यक्तीच्या आत्महत्येनंतर बरेचदा लोक त्याच्याबद्दल सांगतात की अशी व्यक्ती खूप छान होती, नेहमी आनंदी दिसायची, प्रेमळपणे भेटायची. अखेर ती व्यक्ती आत्महत्येसारखे पाऊल कसे उचलू शकते? जेव्हा बाहेरून आनंदी दिसणारे लोक नैराश्यामुळे आत्महत्या करतात तेव्हा अशी प्रकरणे स्माईलिंग डिप्रेशनची असतात. हसरा चेहराही नैराश्याचा बळी ठरू शकतो हे समजून घेणे आवश्यक आहे.**

### तीन प्रमुख लक्षणे

अभ्यासक सांगतात, की असे नैराश्य इतर प्रकारांपेक्षा खूप वेगळे आहे, त्यामुळे ते ओळखणे थोडे कठीण आहे. पण या आजाराची तीन मुख्य कारणे सांगता येतात. त्यात प्रथम, अंतर्यामी दुःख, कोणत्याही कामात रस नसणे आणि लवकर थकणे. म्हणजेच तुम्ही तुमच्या दैनंदिन जीवनात खूप काही करत असाल, पण कुठेतरी तुम्हाला त्या कामांमध्ये रस नाही. यानंतर, तुम्हाला नेहमी थकवा जाणवतो . जर तुम्हाला नेहमी डोकेदुखी किंवा शरीर दुखत असेल तर आजच याकडे लक्ष द्या.

- स्वतःची तुलना इतर लोकांशी करू लागतो : नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीच्या मेंदूतील सेरोटोनिनचे प्रमाण कमी होते. त्यानंतर आपण स्वतःची इतर लोकांशी तुलना करू लागतो. आपल्या सभोवतालच्या लोकांपैकी आपण सर्वात वाईट आहोत. तुम्ही तुमचा वाईट काळ तुमच्या चांगल्या काळाशी जोडू लागता आणि स्वतःलाच अपशब्द वापरु लागतात. तुम्ही केलेले प्रत्येक काम इतरांच्या तुलनेत कमी आणि निरुपयोगी वाटते. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आजूबाजूच्या लोकांशी याबद्दल बोलणे महत्त्वाचे आहे.
- तुम्ही बरे होऊ शकता : अनेक लोकांना त्यांची प्रतिमा खूप महत्त्वाची आहे. यामुळे ते नाराज असले तरी ते हसतच राहतात. मानसोपचार तज्ञांच्या मते, हसऱ्या चेहऱ्यामागे दडलेले नैराश्याचे सर्वात मोठे कारण असू शकतो हे आपण स्वीकारू इच्छित नाही. आपल्या आजूबाजूचे लोक किंवा आपले मित्र काय विचार करतील किंवा काय म्हणतील या कारणाने मानसोपचार तज्ञाला भेटायला अनेक जण घाबरतात आणि प्रत्येक समस्येवर आत्महत्या हाच उपाय मानू लागतात.
- लोकांशी बोलण्याचीही इच्छा नसते : ज्यांना नैराश्य असते त्याबद्दल इतर लोकांशी बोलण्याचीही इच्छा नसते, त्यांच्यासाठी नैराश्य हे सर्वात धोकादायक असते. अशा परिस्थितीत माणूस आत्महत्येचा विचार करू लागतो. अशा परिस्थितीत नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीला असे वाटू लागते की त्याला कोणीही मदत करू शकत नाही.

### नैराश्यावर इलाज

आपल्याला अनेकदा हे समजत नाही की नैराश्याचे निदान झाल्यानंतर पुढची पायरी काय असेल? हे जाणून घेतल्यावर, सर्वप्रथम, होय, आपण नैराश्याने ग्रस्त आहात आणि आपल्याला मानसोपचार तज्ञाची आवश्यकता आहे हे स्वीकारण्याचे धैर्य गोळा करणे महत्वाचे आहे. यानंतर, ज्यांच्यावर तुमचा सर्वात जास्त विश्वास आहे अशा लोकांशी तुमच्या मनःस्थितीबद्दल बोला. आज अनेक थेरपी आणि औषधे उपलब्ध आहेत, ज्यामुळे नैराश्य संपते.

### विश्वास जिंका

जर आजूबाजूला कोणी या प्रकारचा हसत-खेळत नैराश्याचा बळी असेल, तर आपण त्याला आरामदायी वाटणे आवश्यक आहे आणि त्याची परिस्थिती जाणून घ्या. या परिस्थितीवर मात करण्यासाठी हसत-खेळत नैराश्याने ग्रासलेल्या लोकांचा विश्वास जिंकणे खूप महत्वाचे आहे.

# ही लक्षणे जाणवली तर इथेच थांबवा सर्वकाही...



**मॅच्युरिटी म्हणा किंवा जबाबदारी, हा एक असा शब्द आहे, जो वेळीच लक्षात आला तर माणसाचे जीवन यशस्वी होते. जबाबदारीबद्दल बोलायचे तरती तर शिकवून कळत नाही ती वेळेनुसारच येते आणि परिस्थितीनुसारच शिकावी लागते. मात्र, मुली या सर्व गोष्टी खूप लवकर शिकतात, पण मुलांनी त्यांच्या जबाबदाऱ्या ओळखणे खूप गरजेचे आहे. कारण लग्नानंतर त्यांची जबाबदारी पूर्णपणे दुप्पट होते. अशा परिस्थितीत पतीने परिपक्व आणि जबाबदार कसे असावे हे जाणून घेतले पाहिजे. पण ही गोष्ट सुद्धा खरी आहे की काही लोकांना जबाबदार होण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागत नाहीत. पण सगळ्यांच्या बाबतीत असं होत नाही. काही मुले लग्नानंतरही प्रत्येक गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून असतात. त्यांनाही त्यांचे काम करण्यात आळस वाटतो. जर तुम्हाला शंका असेल की तुमचा नवरा देखील या श्रेणीत येतो, तर आज आम्ही तुम्हाला अशी काही लक्षणे सांगणार आहोत जी दर्शवितात की तुम्ही एका बेजबाबदार व्यक्तीशी लग्न केले आहे.**

- घरच्या कामात मदत न करणे : आजकालच्या मुलींची अपेक्षा असते की आपल्या पतीने सुद्धा घरकामात आपल्याला मदत करावी आणि ही अपेक्षा अजिबात चुकीची नाही. कारण ऑफिसचे काम सांभाळून घरचे काम करणे ही एकटी पत्नीची जबाबदारी नाही. पण तुमचा नवरा मात्र तुम्हाला घरकामात मदत करत नसेल वा तुम्हाला होणारा त्रास पाहूनही त्याचे मन विरघळत नसेल तर समजून घ्या की त्याला अजूनही त्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव नाही. तो अजूनही लग्नाआधी होता तसाच वागतो आहे.
- सतत घरी उशिरा येणे : अधूनमधून कामावर उशीर होणे अगदी सामान्य आहे. पण तुमचा नवरा नेहमी उशिरा येतो आणि कोणत्याही गोष्टीसाठी वेळेवर पोहोचत नसेल, तर हे एक बेजबाबदार व्यक्ती असण्याचेच लक्षण आहे. अशा व्यक्तीसोबत तुमचे जीवन व्यर्थ आहे.
- सगळं काही तुम्हालाच करावं लागतं : पत्नी आपल्या पतीसाठी सर्व काही करण्यास तयार होते. पण त्या बदल्यात पतीने तिची काळजी घेतली नाही तर पत्नीचा हिरमोड होणे साहजिक आहे. तुमच्या जीवनात तुमच्या पतीचे काहीच योगदान नसेल तर तो एक बेजबाबदार व्यक्तीच आहे.
- वचन न पाळणे : वचन मोडणे ही केवळ नात्यासोबतची प्रतारणाच नाही तर एक त्रासदायक भावना सुद्धा आहे. जर तुमचा नवरा तुम्हाला एखादे वचन वा आश्वासन देतो पण वेळ आली की ते विसरतो आणि जे मनाला हवे तेच करतो. तुमच्या मानाचा अजिबात विचार करत नाही तर हे लक्षण आहे की तुम्ही अशा पुरुषाशी लग्न केले आहे ज्याला तुमच्या मनाची अजिबात पर्वा नाही.
- उधळपट्टी करणे : लग्नानंतर कोणत्याही पतीला आर्थिक नियोजन हे करावेच लागते. पण जर तुमचा नवरा खर्चीक असेल आणि भविष्यासाठी त्याच्याकडे कोणतीही बचत नसेल तर



तुमचे भविष्य खरोखरच धोक्यात आहे. निवृत्तीनंतर आजारपण किंवा घर चालवण्यासाठी पैसा खूप महत्त्वाचा असतो. यात केवळ पत्नीनेच नव्हे तर पतीनेही मोठे योगदान दिले पाहिजे. जर तुमचा नवरा पैसा अजिबात वाचवत नसेल तर ते त्याच्या बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

# अशा रिलेशनशिपचे भवितव्य काय?

**कोणतेही नाते हे दोन व्यक्तींनी मिळून बनते. त्यामुळेच जर ते निभवायचे असेल तर दोघांकडून प्रयत्न होणे देखील तितकेच गरजेचे असते. जेव्हा दोघांपैकी केवळ एकच व्यक्ती नाते वाचवण्यासाठी धडपडत असतो आणि दुसऱ्या व्यक्तीला त्याची कदरही नसते तेव्हा अशा रिलेशनशिपचे भवितव्य काहीच नसते. हीच स्थिती खूप काळ राहिली तर नात्याशिवाय अन्य संबंध सुद्धा बिघडत जातात. एकवेळ अशी येते की दोन्ही व्यक्ती एकमेकांना एकमेकांचे शत्रू समजू लागतात.**



अनेकदा जी व्यक्ती संवेदनशील असते ती भावनिकदृष्ट्या निखळून पडते. हे होऊ द्यायचे नसेल तर वेळीच नात्याची स्थिती ओळखायला हवी. अनेकांना हेच ओळखता येत नाही आणि त्याचा परिणाम म्हणून आयुष्य उद्ध्वस्त होते. असे नाते हे अनेकदा एकतर्फी नाते म्हणूनच ओळखले जाते. आज आम्ही तुम्हाला असे काही संकेत सांगणार आहोत जे तुम्हाला नाते ओळखण्यात मदत करू शकतात.

### नेहमी तुम्हीच समजून घेत असाल तर...

जर नात्यातील एकच व्यक्ती नेहमी तडजोड करत असेल तर नाते संबंध हळूहळू बिघडू लागतात आणि ते उद्ध्वस्त व्हायला वेळ लागत नाही. तसेच या गोष्टीतून हेच दिसते की तुमचे नाते घट्ट नाही. उलट केवळ एका व्यक्तीमुळे ते टिकून असल्याने कमकुवत आहे. तडजोड करावी लागणे हे एकतर्फी प्रेमाचे सर्वात सामान्य लक्षण आहे. प्रेमात पडल्यानंतर तुम्ही जर सतत समजून घेत असाल वा तडजोड करत असाल तर सावधान व्हा. कारण जोडीदाराला सवय लागली तर तो त्याचा गैरफायदा घेऊ शकतो.

### ओढ फक्त तुम्हाला असेल तर

कोणतेही नाते टिकवण्यासाठी दोन व्यक्तींचे समान प्रयत्न आवश्यक असतात. अशा परिस्थितीत, जर केवळ तुम्हीच तुमच्या जोडीदाराला भेटायला किंवा संपर्कात राहायला, तुमच्या भावना शेअर करायला सांगत असाल, पण तो मात्र त्यासाठी काहीच प्रयत्न करत नसेल वा त्याला या गोष्टींची पर्वा नसेल तर हे देखील एकतर्फी नातेसंबंधाचे लक्षण आहे.

### नेहमी तुम्हीच चुकीचे ठरत असाल तर



जर तुमचा पार्टनर कोणत्याही चुकीची जबाबदारी घेत नसेल आणि नेहमी तुम्हीच माफी मागावी आणि समजून घ्यावे अशी अपेक्षा करत असेल तर हे स्पष्टपणे एकतर्फी प्रेमाचे लक्षण आहे. कारण जर त्यालाही तुमचा आदर असेल तर प्रत्येकवेळी तो तुम्हाला चुकीचे ठरवणार नाही.

### वारंवार स्वतःला सिद्ध करणे

एकतर्फी नात्यात समोरची व्यक्ती तुम्हाला अशा स्थितीत आणते की तुम्ही स्वतःचे महत्त्व विसरता. तुम्हाला या नात्यात राहायचे आहे की नाही हे माहित नसते पण तरीही जोडीदारासाठी स्वतःला पुन्हा पुन्हा सिद्ध करत असला तरहे सुद्धा एकतर्फी नात्याचे लक्षण आहे आणि अशा नात्यामधून तुम्ही जास्त अपेक्षा करू शकत नाहीत.

### एकटेपणा जाणवणे

जर तुम्ही एकतर्फी नात्यात असाल तर तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून कधीच भावनिक आधार मिळणार नाही. जेव्हा तुम्ही तुमच्या मनातील गोंधळ त्याच्याशी शेअर घेण्याचा प्रयत्न कराल तेव्हा तो एक तर तुम्हाला इग्नोर करेल किंवा वरवर दिलासा देईल. पण मनापासून तो कधीच तुमची गोष्ट एकून घेणार नाही. कारण त्याच्यासाठी तुमच्या फिलिंगला किंमत नसेल. त्यामुळे असे काही होत असेल तर हे देखील एकतर्फी नात्याचे लक्षण आहे व अशा नात्यातून तुम्ही वेळीच बाहेर पडले पाहिजे.

## शॉर्ट न्यूज

### पारनेरमधील खातेदारांना मन:स्ताप

■ **पारनेर :** येथील स्टेट बँकेचे एटीएम, सीडीएम, खातेपुस्तक छपाई मशिन बंद पडले असून, शाखाधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे खातेदारांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक दिवसापासून येथील स्टेट बँकेचे एटीएम मशीन बंद असल्याने शहरातील, तसेच तालुक्यातील ग्राहक बँकेत पैसे भरण्यासाठी किंवा काढण्यासाठी येतात. मात्र, मशीन बंद असल्याने खातेदारांना विनाकारण नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ही सुविधा बंद असल्याने ग्राहकांना बँकेतून पैसे काढणे व भरणे यासाठी रांगेत उभे राहावे लागत आहे.

### मालवण घटनेप्रकरणी राष्ट्रवादीचे निवेदन

■ **संगमनेर :** मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी संबंधित अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन संगमनेर राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने प्रांताधिकारी शैलेश हिंगे यांना देण्यात आले. सदर निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारलेला पुतळा अवघ्या आठ महिन्यांत कोसळला ही दुर्दैवी आणि वेदनादायी घटना आहे.

### नवरदेवाची एजंटकडून फसवणूक

■ **राहुरी :** शहरातील कनगर रोड परिसरात रहिवासी असलेल्या तरुणाशी जळगाव येथील तरुणीचा विवाह लावून देण्यात आला. लग्नानंतर अवघ्या दोन दिवसांनी नवरीला घ्यायला पोलिस आले. तेव्हा आपली फसवणूक झाल्याचे नवरदेवाकडील लोकांच्या लक्षात आले. या घटनेतील एक ३० वर्षीय शेतकरी तरुण राहुरी शहरातील कनगर रोड परिसरात आपल्या कुटुंबासह राहतो. बऱ्याच दिवसांपासून तो लग्नासाठी मुलगी शोधत होता. याचा गैरफायदा घेऊन राहाता येथील एका एजंटने त्याला मुलगी दाखविली. ही मुलगी नेवासा येथील असल्याचे सांगितले.

### डेपो परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

■ **श्रीगोंदा :** घनकचरा डेपोतील नगरपरिषद व्यवस्थापन बायोमाईनचे काम ऐन पावसाळ्यात सुरू करण्यात आल्याने परिसरात दुर्गंधी सुटली आहे. घनकचरा व्यवस्थापन डेपोवर प्रचंड कचरा साठवलेला आहे. हा कचरा बायोमायनिंग करण्यासाठी गेल्या सहा महिन्यांपूर्वी ३५ लाख रुपयांचे टेंडर दिले होते. मात्र ते काम उन्हाळ्यामध्ये सुरू न करता पावसाळ्यात सुरू करण्यात आल्याने परिसरामध्ये दुर्गंधीचे प्रमाण वाढले आहे.

# डॉ.सुजय विखेंचा अर्ज निकाली काढल्याचे वृत्त चुकीचे

## निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

◣ **नगर:प्रतिनिधी**

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत अहमदनगर मतदारसंघाचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी लोकसभा मतदारसंघामध्ये 'चेकींग अँड व्हेरिफीकेशन ऑफ बर्न्ट मेमरी/मायक्रोकन्ट्रोलर ऑफ ईव्हीएम' बाबत केलेला अर्ज भारत निवडणूक आयोगाने निकाली काढल्याचे एका मराठी वृत्तवाहिनीवर प्रसारित वृत्त चुकीचे असल्याचे स्पष्टीकरण जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.**




या वृत्तामध्ये कोणतेही तथ्य नसून डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अहमदनगर लोकसभा मतदारसंघामधील निवडणूक प्रक्रियेबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात कायदेशीर प्रक्रिया सध्या सुरू असून सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे.

**२ सप्टेंबरला बाजू मांडण्याचा आदेश**

विखे यांनी लंके यांच्या विजयाला आव्हान देणारी निवडणूक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) खंडपीठात दाखल केली आहे. त्यामध्ये न्यायालयाने लंके यांना समन्स पाठविले असून २ सप्टेंबरला बाजू मांडण्याचा आदेश दिला आहे.

**खंडपीठाच्या आदेशानुसार कार्यवाही**

'चेकींग अँड व्हेरिफीकेशन ऑफ बर्न्ट मेमरी/मायक्रोकन्ट्रोलर ऑफ ईव्हीएम' बाबत मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ जे निर्देश देतील त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# छत्रपतींचा पुतळा कोसळल्या प्रकरणी कारवाई करावी

## शिवभक्त चंद्रकांत लबडे यांची मागणी

◣ **शेवगाव : प्रतिनिधी**

**मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक प्रशासनाच्या निष्कृष्ट कामामुळे ८ महिन्यांत कोसळल्याबद्दल जाहीर निषेध करण्यात आला. या घटनेची सखोल चौकशी करून दोषीवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे तहसिलदारांमार्फत मुख्यमंत्र्याकडे केली आहे.**




दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जर सदरील घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी. अन्यथा पुर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी शिवभक्त चंद्रकांत महाराज लबडे, पत्रकार ज्ञानेश्वर फसले, तारामती दिवटे, अक्षय बोडखे,शिवाजीराव काटे, शितल पूरनाळे,भरत लोहकरे, एकनाथ कूसळकर, माऊली धनवडे,आकाश कुऱ्हाडे, दादा रसाळ, दत्तात्रय फुंदे, सुरेश कोरडे, संजय नागरे, भुसे सर ,दिपक शेडे, ज्ञानेश्वर खबाले,विष्णु घनवट,महेश मीसाळ , गोरख भापकर, पांडुरंग नाबदे या सह मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते.

# शेती मालाच्या आयात व निर्यात धोरणाची माहिती आधी देण्याची गरज



शेतकऱ्यांना केंद्र सरकारचे आयात निर्यात धोरण चार महिने अगोदर माहीत असणे अतिशय गरजेचे आहे. शेतीतून पिकणारे सर्व मालाचे खाद्य, मालाचे उत्पादन गहू,तांदूळ, कापूस,सोयाबीन,कांदा, फळ, भाजीपाला इ. कितीची निर्यात करायची आहे अथवा कितीची आयात करायची आहे हे जर शेतकऱ्यांना पेरणीच्या मौसमात रब्बी व खरीप हंगामाच्या मौसमात कळाले तर त्याप्रमाणे कमी किंवा जास्त पेरणी(लागवड) करण्यात येईल. उदा. कापूस,सोयाबीन,कांदा ही नगदी पिक जवळपास सर्व शेतकरी लागवड करतात. त्यांना माहीत नसते त्या उत्पादनाचे शेतकऱ्यांचे आंतरराष्ट्रीय दर व इतर देशाचे आयात धोरण काय आहे. देशात कोणत्या उत्पादनात मालाचा दरवर्षीचा साठी किती शिल्लक आहे याची माहिती नसते. इकडे देशात एखाद्या मालाचे प्रचंड मोठ्या प्रमाणात उत्पादन होते.

देशातील मागणीपेक्षा पुरवठा जास्त होतो त्यामुळे त्या मालाचे दर पडतात परिणामी शेतकरी संकटात येतात. शेतीमालाला वरील छोटे छोटे व्यापारी त्यावरील प्रक्रिया उद्योग करणारी कारखाने अडचणी येतात. याचा परिणाम लहान व्यापारी आणि लहान उद्योगांना सहन करावा लागतो. अशा लहान व्यापारी आणि लहान उद्योग समूहांना कर्जाचा डोंगर भोगावा लागतो. कारण मग ते कर्जाची परतफेड करू शकत नाही. त्यामुळे बँके ही बुडतात अशावेळी शेतकऱ्यांना कमी भावात माल विकावा लागतो. त्यामुळे उत्पन्नाचा खर्चही निघत नाही.

शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी खाजगी सावकारांकडून किंवाबँकेकडून कर्ज काढावे लागते.त्यामुळे तो कर्जबाजारी होतो रोजचे प्रपंच चालवणे हे त्यासाठी कठीण होत जाते मुलांची महागडी शिक्षण, कुटुंबाची महागडी दवाखाने आणि इतर दैनंदिन गरजा भागवणे हे त्यासाठी अधिकाधिक कठीण होत जाते. या कारणामुळे शेतकरी बँकेचे कर्ज वेळेवर फेळू शकत नाही. परिणामी शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे.

ऐनवेळी मोठ्या मोठ्या व्यापाऱ्यांना शेतकऱ्यांच्या आयात व निर्यात धोरण माहित असते किंवा माहीत होते. ते प्रचंड मोठ्या प्रमाणात मालाचा साठा करतात आणि अशावेळी सरकारही त्या मालाची निर्यात करते. परिणामी बोटावर मोजण्या एवढे लोक अगदी श्रीमंत बनतात. देशात एखाद्या मालाचे उत्पादन कमी झाले तर मागणी वाढते पुरवठा कमी होतो त्यामुळे त्या खाद्यमालाचे दर वाढत जातात त्यामुळे ग्राहकालाही दर वाढीचा फटका बसू शकतो. महागाई वाढते आणि शेतकऱ्यांची बदनामी केली जाते.याकरिता सरकारने चार महिने किंवा पेरणी अगोदर शेतीवर येणाऱ्या नैसर्गिक संकटाचा अंदाज घेऊन आणि अभ्यास करून देशात कोणते उत्पादन किती होईल याबाबत योग्य असे धोरण ठरविणे गरजेचे आहे. याप्रकारे केंद्र सरकारने आयात व निर्यातीची माहिती दिली शेतकऱ्यांना सरकारच्या धोरणानुसार उत्पादन करता येईल. त्यामुळे त्यांना योग्य दर मिळण्यास मदत होईल ग्राहकांनाही योग्य भावात माल मिळेल व समतोल साधता येईल.

**यश गणेशराव चौखंडे**
परतवाडा जि. अमरावती
८७६७८९५६१०

# राहुरी तालुका अँकर असोशियनच्या अध्यक्षपदी तनपुरे उपाध्यपदी हापसे तर सचिवपदी जाधव यांची निवड


◣ **राहुरी : प्रतिनिधी**

**राहुरी तालुका अँकर असोशियनची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी बापूसाहेब तनपुरे, उपाध्यक्षपदी गणेश हापसे तर सचिवपदी श्रीकांत जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.**



राहुरी तालुक्यात सांस्कृतिक व धार्मिक कार्यात नेहमीच सूत्रसंचालन जबाबदारी पार पडणाऱ्या कार्याध्यक्षपदी अँकर असोसिएशनच्या माध्यमातून राहुरी तालुक्यात सामाजिक व विधायक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या असोसिएशनच्या अध्यक्षपदी बापूसाहेब तनपुरे, उपाध्यक्षपदी गणेश हापसे तर सचिवपदी श्रीकांत जाधव तर कार्याध्यक्ष आप्पासाहेब ढोकणे,सल्लागार राजेश मंचरे,खजिनदार- साईनाथ कदम,सहसचिव- हसन सय्यद, संघटक- राजू कोतकर,सहसंघटक- निखिल कराळे यांची निवड करण्यात आली आहे.

# नगर जिल्ह्यात यलो अलर्ट जारी कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता



◣ **नगर : प्रतिनिधी**

**भारतीय हवामान विभागाने नगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांत शुक्रवार (ता. ३०) ते मंगळवार (ता. ३ सप्टेंबर)पर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे. नगर, जालना, पुणे, सातारा, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, अकोला, अमरावती, भंडारा, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांत आगामी पाच दिवस दमदार पाऊस होण्याची शक्यता आहे. या कालावधीत वादळीवारा व विजेच्या कटकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे.**

पुणे वेध शाळेने दिलेल्या माहितीनुसार पूर्व मध्य बंगालचा उपसागर व लगतच्या भागावर वाऱ्याची एक चक्रीय स्थिती तयार झाली आहे. त्याच्या प्रभावाखाली उत्तर बंगालच्या उपसागरामध्ये एक कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यातील काही जिल्ह्यात पावसाची शक्यता आहे. जळगाव व नगर येथे आजपासून पाच दिवस मेघगर्जना व विजांच्या कडकडाटासह तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.





# पर्यावरणपुरक गणेशमुर्तींच्या निर्मितीमध्ये रमले विद्यार्थी!

## पारनेरच्या न्यू इंग्लिश स्कुलमध्ये कार्यशाळा

पारनेर : संदीप इधाटे

**लवकरच होऊ घातलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर पारनेर येथील न्यू इंग्लिश स्कुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या इको फ्रेंडली गणेश मुर्ती बनवा कार्यशाळेत पर्यावरणपुरक गणेशमुर्ती निर्मितीमध्ये विद्यालयाचे विद्यार्थी रमून गेले.**

शिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांच्या संकल्पनेतून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत १८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आकर्षक गणेश मुर्तींची निर्मीती करण्याचा आनंद लुटला. या कार्यशाळेच्या माध्यमातून मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनाची जाणीव जागृत करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेश मुर्तीचे विद्यालयात प्रदर्शन भरविण्यात आले होते.

प्राचार्य अर्जुन भुजबळ, अजित दिवटे, मनिषा गाडगे, निर्मला सोबले, मनिषा जगदाळे, जयवंत पुजारी, ज्ञानेश्वर कवडे, कल्पना नरसाळे, सुरेखा थोरात, मनोहर कोरडे, श्रीकांत शिंदे, संदीप पांढरे, प्रमोद कोल्हे, दिनेश आंबेकर, प्रविण काळे यांनी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या मुर्तींचे कौतुक केले.



### स्वत:च्या घरी गणेशाची स्थापना करणार

या कार्यशाळेत गणेशाची सोंड, हात, विविध अवयव कसे तयार करावेत याचे प्रात्यक्षीक ज्ञानेश्वर कवडे यांनी करून दाखविले. त्यानंतर शाडूच्या मातीचा वापर करून विद्यार्थ्यांनी गणरायाच्या सुबक मुर्ती साकारल्या. स्वत:च्या हाताने निर्मिती झालेल्या गणरायाची आपल्या घरी स्थापना करण्याचा निर्धार प्रत्येक विद्यार्थ्याने यावेळी केला.

### विद्यार्थ्यांनी कला जोपासावी

गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठया उत्साहाने साजरा करण्यात येतो. घरोघर गणेशमुर्तीची प्रतिष्ठापना करत मनोभावे पुजा अर्चा केली जाते. त्या अनुषंगाने गणेशमुर्तीना मोठी मागणी असेत. त्यातून लाखो-करोडो रूपयांची उलाढाल होते. विद्यार्थ्यांनी गणेश मुर्ती निर्मीतीची कला भविष्यात जोपासली तर या क्षेत्रात विद्यार्थी आपले करिअर करू शकतात.

अर्जुन भुजबळ, प्राचार्य

### चौकट कार्यशाळेचा आनंद लुटला

शिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांनी शाडू माती कशी भिजवावी ? त्यापासून गणेशाच्या विविध अवयवांचे आकार कसे तयार करायचे याचे मार्गदर्शन केले. आम्ही माती सोबत हसत खेळ गणेश मुर्ती साकारली. या कार्यशाळेतून आम्ही आनंद लुटला.

आर्यन वैद्य, विद्यार्थी

# गटसचिवांच्या अडचणी दूर करण्यासाठी समिती गठीत

## ■ नगर जिल्ह्यातून प्रशांत गायकवाड यांची निवड ■ मंत्री दिलीप वळसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत निर्णय



■ राज्यातील गट सचिवांच्या समस्या दूर करण्यासंदर्भात सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली.

पारनेर : प्रतिनिधी

**राज्यातील गटसचिवांच्या विविध अडी-अडचणी दुर करण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अखत्यारीत समिती गठीत करण्यात आली असून या समितीवर नगर जिल्हयातून जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली.**

सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीस आमदार सत्यजित तांबे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, गटसचिव संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत प्रामुख्याने संस्था ठरावावरील गटसचिवांना केडरमध्ये सामाऊन घ्यावे या विषयावर चर्चा करण्यात आली. राज्यातील विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या सर्व गट सचिवांना प्रशिक्षण मिळावे अशी मागणी यावेळी आ. सत्यजित तांबे, प्रशांत गायकवाड यांनी केली. केंद्र शासनाने सहकार कायद्यामध्ये अमुलाग्र बदल केले असून त्या अनुषंगाने हे प्रशिक्षण आवश्यक असल्याचेही यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले.

गट सचिवांच्या अनेक मागण्या आहेत. त्या दूर करण्यासाठीही सहकार मंत्री वळसे यांनी पुढाकार घेण्याची मागणी करण्यात आल्यानंतर सहकार सचिवांच्या आखत्यारीत गट सचिवांच्या समस्या सोडविण्यासाठी एक समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही समिती राज्यातील गट सचिवांच्या समस्यांचा अभ्यास करून समितीच्या अहवालानंतर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री वळसे यांनी यावेळी दिली.

### सचिवांच्या प्रश्नांसाठी गायकवाड आग्रही

नगर जिल्ह्यातील गट सचिवांच्या विविध अडी-अडचणी तसेच समस्या दूर करण्यासाठी, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड हे पुर्वीपासूनच आग्रेसर आहेत. गटसचिवांच्या प्रश्नांबाबत त्यांनी नेहमीच आग्रही भूमिका घेतली असून गट सचिवांच्या समस्या दूर करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये त्यांची जाणिवपुर्वक निवड करण्यात आल्याचे वळसे पाटील यांनी सांगितले. या समितीवर निवड झाल्याबद्दल वळसे यांनी गायकवाड यांचे अभिनंदनही केले.

# साहित्यातून समाजातील जीवनानुभवाचे चित्रण

## गीतकार बाबासाहेब सौदागर यांचे प्रतिपादन



पारनेर : प्रतिनिधी

**समाजातील विविध घटना, प्रसंगांचे व जीवनानुभवाचे चित्रण साहित्यातून पुढे येते असे प्रतिपादन प्रसिध्द गीतकार व कवी बाबासाहेब सौदागर यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये चेतना वार्षिक अंकाच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सौदागर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना सौदागार म्हणाले, मी शब्दांची पुजा करणारा माणूस आहे. समाजातील विविध घटना, प्रसंगांच्या निरीक्षणातून मला काव्यरचना व गीतरचना सुचत जाते. विद्यार्थ्यांनीही दर्जेदार साहित्याचे वाचन करावे. समाजात आपल्या आजूबाजूला घडणा-या घटना, प्रसंगांचे निरीक्षण करावे व त्यामाध्यमातून लिहिते व्हावे. परीक्षेत कमी गुण मिळाले तर निराश होउ नका. आपल्यातील कौशल्ये व कुलागुणांना ओळखून जीवनाची वाटचाल करावी. यावेळी गायिका व चरित्र अभिनेत्री कविता सौदागर यांनी गीतरचना सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी पत्रकार मार्तंड बुचूडे, शशिकांत भालेकर, संतोष सोबले यांच्यासह चेतना वार्षिक अंकाच्या संपादक मंडळातील प्रा. शुभदा आर्डे, डॉ. विजया ढवळे, डॉ. हनुमंत गायकवाड, डॉ. हरेश शेळके, प्रा. अशोक मोरे, डॉ. सजन खपके, डॉ. भाउसाहेब शेळके आदी प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नंदकुमार उदार यांनी केले तर डॉ. सजन खपके यांनी आभार तर डॉ. हरेश शेळके यांनी सुत्रसंचलन केले.

तोपर्यंत विचार आकार घेउ शकत नाहीत जोपर्यंत लिहिण्याचा प्रयत्न केला जात नाही तोपर्यंत विचार शब्दरूपाने आकार घेऊ शकत नाहीत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात आयोजित केलेल्या विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा. महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात विविध विषयांवरील लेख लिहून व्यक्त व्हावे.

डॉ. लक्ष्मणराव मतकर
प्राचार्य, पारनेर महाविद्यालय

# द्वितीय वर्ष फार्मसीमध्ये रोहिणी सुपेकर प्रथम

## वराळ महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील श्रध्दा रूरल मेडिकल सोशल वेल्फेअर ऑफ एज्युकेशन ट्रस्टच्या सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील कॉलेज ऑफ फार्मसी या कॉलेजच्या व्दितीय वर्ष फार्मसी अभ्यासक्रमाचा निकाल शंभर टक्के लागला. रोहिणी सुपेकर हिने महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला.**




लोणारे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्ष्ज्ञण विभागामार्फत या परीक्षांचे आयोजन करण्यात येते. यंदाही वराळ महाविद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली.

यंदाच्या परीक्षेत रोहिणी सुपेकर हिने प्रथम क्रमांक मिळविताना ८.९ एसजीपीए गुण मिळविले. रोहिणी सुपेकर ही पठारवाडी येथील असून पठारवाडीचे सरपंच भास्करराव सुपेकर यांची पुतणी आहे. वैष्णवी जांभुळकर हिने व्दितीय क्रमांक मिळविताना ८.८ एसजीपीए गुण मिळविले. प्रतिक्षा रोहिले हिने ८.७ एसजीपीए गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. आकांक्षा पवार हिने ८.६एसजीपीए गुण मिळवून चौथा, अपेक्षा पवार हिने ८.५ एसजीपीए गुण मिळवून पाचवा, स्नेहल बोबडे हिने ८.४ एसजीपीए गुण मिळवून सहावा, किरण काळे याने ८.४ एसजीपीए गुण मिळवून सातवा क्रमांक मिळविला.

उत्तीण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे अध्यक्ष रंगनाथ वराळ यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. कुलदीप वैद्य, उपप्राचार्य डॉ. शिफा शिकलगार, सर्व संचालक मंडळ, तसेच डी फार्मसी, बी फार्मसी अभ्यासक्रमाचे प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या. वराळ पाटील फार्मसी कॉलेज हे ग्रामीण भागात औषण निर्माण शास्त्राचे शिक्षण देणारे महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांवर निघोज व परिसरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# रक्तदान ही काळाची गरज !

## दीपक लंके यांचे प्रतिपादन | रांधे येथे रक्तदान शिबिर संपन्न




रांधे : प्रतिनिधी

**आजकालच्या धकाधकीच्या जीवनात रक्ताची कधीही आवश्यकता भासू शकते. त्यामुळे प्रत्येकाने रक्तदान करून आपली सामाजीक बांधिलकी जपण्याचे आवाहन करतानाच रक्तदान ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन दीपक लंके यांनी केले.**

नीलेश लंके प्रतिष्ठान, रांधे ग्रामपंचायतीच्या वतीने मा. सरपंच कै. लक्ष्मण आवारी यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा शुभारंभ लंके यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. ४१ रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले.

रक्तदान हे श्रेष्ठ दान असल्याचे सांगत यावेळी बोलताना लंके म्हणाले, ज्यावेळी एखादी व्यक्ती आजारी असते किंवा अपघातानंतर जखमी व्यक्तीला तातडीने रक्ताची आवश्यकता असते. त्यावेळी रक्ताची किंमत आपणास समजते. कोरोना महामारीच्या काळामध्ये मोठया प्रमाणावर रक्ताचा तुटवडा निर्माण झाला होता याचा अनुभव आपण घेतलेला आहे. त्यामुळे प्रत्येकाने ज्या ज्या वेळी रक्तदान करण्याची संधी मिळेल त्यावेळी उस्फुर्तपणे रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन लंके यांनी केले.

यावेळी डॉ. भास्कर शिरोळे, जितेश सरडे, बाळासाहेब पुंडे, संतोष काटे, किरण पानमंद, सचिन साखला, किरण पानमंद, मुन्ना पगारीया, शुभम शिरोळे, किरण जमदाडे, गोविंद पानमंद, संग्राम पावडे, नुर कुरेशी, विजय वाळेकर, जावेद कुरेशी, दिलीप आवारी, अश्विनी आवारी, उत्तम गायकवाड, आबाजी आवारी, राजेंद्र आवारी, बाळासाहेब साबळे, अनिल आवारी, अमोल आवारी, विनोद फापाळे, अमोल शिंदे, साईनाथ झिंजाड, प्रविण साबळे, प्रदीप भोसले, वरून सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# निघोजला संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी

## विविध मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन



निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील नाभिक समाजाच्या संत सेना महाराज सभागृहात श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी सरपंच व निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे व संचालक भाऊ रसाळ यांच्या हस्ते पुजन करण्यात आले.**

यावेळी भानुदास महाराज रसाळ यांचे प्रवचन झाले. त्यानंतर भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ, ग्रामपंचायत सदस्य मंगेश वराळ पाटील,भाजपचे तालुका सरचिटणीस मोहनशेठ खराडे, भाजपचे अल्पसंख्याक समाज सेलचे तालुकाध्यक्ष मनोहर राऊत यांनी श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

भाजपचे सांस्कृतिक सेलचे तालुका अध्यक्ष विलासराव हारदे, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार, आपले गाव गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग, बाबाजी कळसकर, नाभिक समाजाचे शहराध्यक्ष नवनाथ राऊत, उपाध्यक्ष नाना राऊत, मार्गदर्शक दत्तात्रय राऊत, मनोहर राउत, किरण राऊत, जितेंद्र राऊत, शशिकांत राउत, शांताराम राऊत, सुनिल राऊत, बबलू बोरुडे, मयुर राऊत, श्लोक राउत, नानाभाऊ राऊत, अंकुश सोनवणे, सोपान राऊत, अभिषेक राऊत, योगेश राऊत, प्रविण राऊत, राहुल काळे आदी तसेच ग्रामस्थ व नाभिक समाजाचे पदाधिकारी व सदस्य तसेच महिला भगिनी यांनी दिवसभरातील कार्यक्रमाला उपस्थित राहून श्रीसंत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

रात्री श्रीराम भजनी मंडळाने भजने गात कार्यक्रमाची शोभा वाढवली यामध्ये शहाजी आतकर, खंडू ईधाटे, चंद्रकांत खाडे यांनी भजने गायली. या दिवसभराच्या कार्यक्रमासाठी नाभिक समाज मंडळातील सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच महिला भगीनी व ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले. यावेळी नाभिक समाजाच्या वतीने भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, ग्रामपंचायत सदस्य मंगेश वराळ पाटील, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांचा नाभिक समाजाच्या वतीने शहराध्यक्ष नवनाथ राऊत, मनोहर राऊत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# धर्म ,संस्कृती आणि संस्कार सर्वाधिक महत्वाचे

## नामदेव महाराज बिलाडे यांचे प्रतिपादन



वडगाव गुंड : प्रतिनिधी

**धर्म आणि संस्कृती सर्वाधिक महत्वाची असून जून्या जाणत्या ज्येष्ठ मंडळीनी धर्म संस्कृतीला महत्व दिल्याने आपल्या देशाच्या संस्कृतीचे अनुकरण जगात होत असल्याचे प्रतिपादन नामदेव महाराज बिलाडे यांनी व्यक्त केले आहे.**

वडगाव गुंड येथील चंद्रभागा भिकाजी लंके यांच्या पुण्यस्मरण कार्यक्रमात ते उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी दिपक आण्णा लंके यांनी सांगितले की आई वडील यांच्या संस्काराची शिदोरी आहे.गंगाधर लंके, भाऊसाहेब लंके यांनी मुले मुली पुतणे नातू यांनी ही संस्काराची शिदोरी दिली.

श्री.पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे चेअरमन चंद्रकांत लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी सामाजिक संस्काराचे जतन करीत संस्कारीक जिवनाला सर्वाधिक महत्त्व दिले असल्याने हा वडगाव गुंड परिसर असो की निघोज गाव असो सर्वच दृष्टीने संपन्न होत नावलौकिकास पात्र ठरले आहे. यावेळी आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांनी वृक्षाचे रोप लंके कुटुंबाला दिले.

या कार्यक्रमास परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच लंके कुटुंबाचे नातेवाईक मित्र मंडळ, आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com